जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१८/१०/२०२३
## दि.१७/१०/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो स्टे ८३९/२०२३,भादविक ३०७,३०२,३२६,३२४,३२३,३४ |
| **फिर्यादी** | संदिप शिंदे,वय-३६ वर्ष,रा.वारघडे वस्ती,बकोरी गाव,पुणे |
| **आरोपीत** | १.किसन नागनाथ पवार,वय-३७ वर्षे २.बालाजी नागनाथ पवार,वय-३४ वर्षे ३.दिगंबर नागनाथ पवार,वय-३२ वर्षे,सर्व रा.बकोरी गाव,ता.हवेली,जि.पुणे ४.सिध्देश्वर दत्तात्रय काळुके,वय-२९ वर्षे,रा.साष्टे,कोलवडी,ता.हवेली,जि.पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१६/१०/२०२३ रोजी २०/३० वा.फिर्यादीचे राहते घरा समोर,वारघडे वस्ती,बकोरी गाव,ता. हवेली,जि.पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचा भाऊ सुहास हरिदास शिंदे,रा.वारघडे वस्ती,बकोरी गाव,पुणे व वडील हरिदास केरबा शिंदे यांचेसोबत त्यांचे घरासमोर बोलत थांबले असताना,यातील आ.क्र.१ हा फिर्यादी यांचे पत्नीला त्रास देत असल्याने फिर्यादी व त्यांचेमध्ये असलेला वाद मिटवुन घेण्यासाठी आ.क्र.१ याने त्याचे इतर साथीदारा सोबत येवुन,फिर्यादी यांचेशी वाद घालुन,त्यांना धक्का-बुक्की करून मारहाण केली. तसेच घरासमोर पडलेला सिमेंटचा पोल उचलुन फिर्यादी यांना यांची खुप नाटके झाली यांना मारून टाका असे म्हणुन फिर्यादी यांचा भाऊ सुहास शिंदे यास जीवे ठार मारण्याचे उद्देशाने त्यांचे डोक्यात सिमेंटचा पोल मारून, त्यांना गंभीर जखमी करून जीवे ठार मारले आहे. तसेच फिर्यादी व त्यांचे वडील हरिदास शिंदे यांना दगड-विटाने मारहाण करून,त्यांचेकडील लोखंडी हत्याराने फिर्यादीचे वडील हरिदास शिंदे यांचे डोक्यात मारून,त्यांना गंभीर जखमी करून,जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक,(गुन्हे), श्री.मारुती पाटील ८३०८१०८१८२ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**